# रे मना

अरे मना, आजतरी थोडासाच वेळ काढ ना जरा
किती ओतप्रोत, काठोकाठ, तुडूंब वाहून चालला आहेस
थोडं रितं करूया ना तुला.

काय काय साचवलं आहेस तुझ्या डोहात
जो हरवून बसलाय त्याचा तळ
आज मी बाहेर काढतेच सगळा गाळ
करते तुला विमल, निर्मळ.

इथे दिसतीय खंत काही राहून गेल्याची
कळत नकळत कर्तव्याला चुकल्याची
इथे आहेत काळजात रुतलेले काही सल
हळव्या मनाला दुखावून डोळ्यात आणती ओल.

कुठे दिसतोय थोडा अहम, कुठे जरा न्यूनगंड
कुठे खेद - नको ते बोलल्याचा
कुठे हुरहुर - अव्यक्त राहिल्याची
आयुष्याचे गणित चुकल्याची.

कुठे आहे निराशा तर कुठे हताशा
कधी तरी मनात जागत होती यशाची आशा.
आनंदाचे क्षणही मिळाले ओंजळीत
आणि जगण्याची उर्मी झालिसे पल्लवित



कुणी म्हणती एक तरी असावा सुहृद
जिथे मनातील साचलेपण होईल दूर
कुणापुढे, तुला मोकळं केलं जरी
तू खरंच रिता होशील का तरी?
स्वतःचा भार देऊन दुसऱ्याच्या शिरी?

मी करते वास्तवाचा समंजस स्वीकार
त्यात विरघळून टाकूयात
जुन्या, पुराण्या डगाच रेंगाळणाऱ्या
तुला कोंडून टाकणाऱ्या भावनांचा विखार.

आता बघ कसा दिसतोयस आरपार
नितळ, निर्मळ आणि आरस्पानी
रोजचा दिवस नव्याने जगत
गुणगुणुया आनंदगाणी.


भारती कुलकर्णी.
बिबवेवाडी, पुणे.
मोबाईल नं :- 98508 11591